सुचक - मा.बाळासाहेब तरस अनुमोदक - मा.रमा ओव्हाळ
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.विमुका/४/कावि/१०८/२०१४, दि.२८/०७/२०१४
विषय - मुंबई पुणे रस्त्यावरील दापोडी ते फुगेवाडी सी एम ई रस्ता रुंदीकरणातील रस्ता सुधारणा करणेच्या कामांतर्गत विद्युत विषयक कामे करणेबाबत.

विषय क्रमांक ४० चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५४० विषय क्रमांक – ४१
दिनांक – ०५/०८/२०१४ विभाग - मध्यवर्ती साहित्य भांडार
सुचक - मा.सदगुरु कदम अनुमोदक - मा.शांताराम भालेकर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/४४०/२०१४, दि.३०/०७/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपरीनगर येथील डिझेल शवदाहिनी चालविणे व निगा देखभाल राखणे कामी मे.अर्जुन आधार स्वयंरोजगार संस्था मर्यादीत यांचेकडून ई-निविदा नोटीस नुसार प्राप्त झालेल्या दरानुसार प्रतिमहा र.रु.५२,२५०/- (अक्षरी र.रू.बावन्न हजार दोनशे पन्नास) अधिक

डिझेल खर्च देणेकामी करारनामा करुन आदेशाच्या तारखे पासून तीन वर्ष काम देण्यास व येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५४१ विषय क्रमांक – ४२

दिनांक – ०५/०८/२०१४ विभाग - मध्यवर्ती साहित्य भांडार

सुचक - मा.सदगुरु कदम अनुमोदक - मा.शांताराम भालेकर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/४/कावि/३६१/२०१४, दि.२८/०७/२०१४

विषय - मे.क्वालिटी केटरर्स यांचे राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजने अंतर्गत तसेच मनपा हद्दीतील पिवळे व केशरी रेशनकार्डधारकांना मोफत आहार पुरविणेबाबत.

विषय क्रमांक ४२ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५४२ विषय क्रमांक – ४३

दिनांक – ०५/०८/२०१४ विभाग - स्थापत्य

सुचक - मा.माया बारणे अनुमोदक - मा.सुनिता वाघेरे

संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/१अ/कावि/१३०/२०१४, दि.३०/०७/२०१४

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र. अ मुख्यालय/HO/१४/२०१३-१४ मधील अ.क्र.१६ अन्वये, प्रभाग क्र.१४ स्पाईन रस्त्यांचे अ प्रभाग कार्यालय ते प्लॉट नं.५९१ पर्यंतच्या सर्व्हिस लेनचे व संत कबीर उद्यान परिसरातील अंतर्गत रस्ते हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेकामी मे.व्हि.एम.मातेरे इन्फ्रा (इं) प्रा.लि. (नि.र.रु. २३,३४,२६७/- (अक्षरी र.रु.तेवीस लाख चौतीस हजार दोनशे सदुसष्ट) पेक्षा २१.५०९% कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१९,२३,७९९/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेमधील निविदा अटीप्रमाणे व नियमानुसार देय असलेल्या मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५४३ विषय क्रमांक – ४४

दिनांक – ०५/०८/२०१४ विभाग - माध्यमिक शिक्षण

सुचक - मा.शांताराम भालेकर अनुमोदक - मा.विनय गायकवाड

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.माध्य/शि/४/कावि/८३८/२०१४, दि.३१/०७/२०१४

मा.अति.आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

मनपाच्या १८ माध्यमिक विद्यालये व औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मोरवाडी व कासारवाडी येथील विद्यार्थ्यांना १५ ऑगस्ट २०१४ स्वातंत्र्य दिनानिमित्त विद्यार्थ्यांना खाऊ म्हणून ६६ ग्रॅम ब्रिटानीया गुड डे रिच बटर कुकीज बिस्कीट पुडे प्रति नग र.रू.९.०९ या दराने एकूण बिस्कीट पुडे नग ९,७६२ प्रमाणे एकूण र.रू. ८८,७३७/- (अक्षरी र.रू.अठ्ठयाऐंशी हजार सातशे सदोतीस) खर्च अपेक्षीत आहे. सदरच्या खर्चास तसेच नामांकीत कंपनी ब्रिटानीया इंडस्ट्रीज लि. बेंगलोर या उत्पादीत कंपनीचे पिंपरी चिंचवड मधील अधिकृत विक्रेते मे.गायत्री एंटरप्रायजेस, पिंपरी यांचेकडून कंपनीच्या दरात बिस्कीटे करारनामा न करता सरळ थेट पध्दतीने खरेदी करणेस तसेच त्यांना सदरची आगाऊ रक्कम अदा करणेस मान्यता

देणेत येत आहे. तसेच बालवाडी विद्यार्थ्यासही बिस्किटे पुरविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५४४ विषय क्रमांक – ४५
दिनांक – ०५/०८/२०१४ विभाग - जलशुध्दीकरण केंद्र से.२३
सुचक - मा.रमा ओव्हाळ अनुमोदक - मा.संध्या गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जशुके/वि/०४/२८९/२०१४, दि.२८/०७/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिं.चिं.म.न.पा.च्या कृष्णानगर पंप हाऊस येथे एक्सप्रेस फिडर घेणेकामी वीज पर्यवेक्षण शुल्क र.रू.१६,१५०/- (अक्षरी र.रू.सोळा हजार एकशे पन्नास) म.रा.वि.वि.कं.स अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५४५ विषय क्रमांक – ४६
दिनांक – ०५/०८/२०१४ विभाग - वायसीएमएच
सुचक - मा.शकुंतला धराडे अनुमोदक - मा.सुनिता वाघेरे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.YCMH/भांडार/२/कावि/२०४/२०१४, दि.३०/०७/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाला मेडीकल गॅसेसचा पुरवठा करणारी सेंट्रल गॅस पाईपलाईन भिंतीवरुन निखळून पडली असुन ती पुन्हा भिंतीवर बसविणेकामी मे.जाम्बोटकर मेडीइक्विप प्रा.लि., मुंबई यांनी सादर केलेले दरपत्रक र.रु.३५,०००/- स्विकृत करणेत आले असुन सदरचे काम मे.जाम्बोटकर मेडीइक्विप प्रा.लि., मुंबई यांचेकडून थेट पध्दतीने, करारनामा न करता, निविदा न मागवता काम करणेकामी व सदर कामास येणा-या र.रू.३५,०००/- (अक्षरी र.रू. पस्तीस हजार) (सर्व करांसह) खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५४६ विषय क्रमांक – ४७
दिनांक – ०५/०८/२०१४ विभाग - उद्यान
सुचक - मा.माया बारणे अनुमोदक - मा.प्रसाद शेट्टी
संदर्भ:- मा.अति. आयुक्त यांचे पत्र क्र.उद्यान/१३/कावि/१९०/२०१४, दि.३१/०७/२०१४
विषय - म.न.पा.चे विविध कार्यक्रमासाठी हार, फुले, गुच्छ इत्यादी साहित्य पुरविणेकामी.

विषय क्रमांक ४७ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५४७ विषय क्रमांक – ४८
दिनांक – ०५/०८/२०१४ विभाग - मध्यवर्ती भांडार विभाग
सुचक - मा.सदगुरु कदम अनुमोदक - मा.बाळासाहेब तरस
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/७/कावि/६४२/२०१४, दि.३१/०७/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे आरोग्य विभागासाठी कचरा ढकलगाडया खरेदीकामी ई-नि.सु.क्र.४६/२०१३-१४ अन्वये

प्राप्त लघूत्तम निविदाकार मे.ऱेखा इंजि.वर्क्स यांचेङून २८५ नग कचरा ढकलगाडया प्रती नग रू.३,६४९/- या दराने खरेदी करणेकामी एकुण र.रू.१०,३९,९६५/- (अक्षरी र.रू.दहा लाख एकोणचाळीस हजार नऊशे पासष्ट) स्विकृत करून व करारनामा करून पुरवठा आदेश निर्गत केलेला असल्याने प्रस्तुतकामी केलेल्या संविदेची माहिती अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५४८ विषय क्रमांक – ४९

दिनांक – ०५/०८/२०१४ विभाग - नागरवस्ती विकास योजना

सुचक - मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक - मा.रमा ओव्हाळ

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नावियो/५/कावि/३३३/२०१४, दि.२८/०७/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

निःसमर्थ (अपंग) कल्याणकारी योजना क्र.१३ अन्वये, मनपा हद्दीतील अंध, अपंग, मुकबधीर विद्यार्थी व नागरीकांना पी.एम.पी.एम.एल.बसपास मोफत देणे करीता सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाकरीता जाहीर प्रकटनानुसार अर्ज मागविणेत आले असुन त्यानुसार ५०९ अर्ज प्राप्त झाले असुन त्यापैकी ३५० अर्ज योजनेच्या अटी शर्तीस अधीन राहून पात्र झाले आहेत. तरी एकुण ३५० पात्र लाभार्थीना र.रू.१,२००/- दरमहा या प्रमाणे ८ महिन्यांसाठी एकुण र.रू.३३,६०,०००/- इतका खर्च अपेक्षित असल्याने प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ यादीनुसार ३५० पात्र लाभार्थीयाना दरमहा र.रू.१,२००/- प्रमाणे ०८ महिन्याचा पास देणेकामी एकुण र.रू.३३,६०,०००/- (अक्षरी र.रू. तेहतीस लाख साठ हजार) चे अपेक्षित खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

<u>सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले -</u>

ठराव क्रमांक – ७५४९ विषय क्रमांक – ५०

दिनांक – ०५/०८/२०१४

सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.शांताराम भालेकर, मा.संध्या गायकवाड यांचा प्रस्ताव -

अर्जून आधार स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्थेस पिंपरीनगर स्मशानभूमीस सुरक्षारक्षक पुरविणेस व त्याकामी किमान वेतन दराने येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५५० विषय क्रमांक – ५१

दिनांक – ०५/०८/२०१४

सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.शांताराम भालेकर, मा.संध्या गायकवाड यांचा प्रस्ताव -

मा.स्थायी समिती ठराव क्र. ६८६३ दिनांक २०/५/२०१४ मध्ये “३.४२ प्रति महा चौ.मी.” नंतर “अधिक संरक्षण खर्च” हा मजकूर समाविष्ट करण्याची दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७५५१ विषय क्रमांक –५२
दिनांक – ०५/०८/२०१४ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय
सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.प्रसाद शेट्टी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. विमुका/७/कावि/६३/१४ दि.४/८/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

दि.९ ऑगस्ट रोजी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत जागतिक आदिवासी दिन साजरा करणेबाबत मा.सभापती शहर सुधारणा समिती यांनी त्यांचेकडील दि.८/७/२०१४ चे पत्रान्वये सुचित केले आहे. मा.आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत दिनांक ९ ऑगष्ट २०१४ रोजी जागतिक आदिवासी दिनाचे आयोजन करणेबाबत सूचना दिलेल्या आहेत. तरी दिनांक ९ ऑगस्ट २०१४ रोजी आदिवासी सांस्कृतिक महोत्सव आयोजित करणेस व त्याकामी येणा-या र.रु.३ लाख पर्यंतच्या खर्चास मा.आयुक्त यांनी मान्यता दिली असली तरी दिनांक ९ ऑगस्ट ऐवजी ऑगस्ट २०१४ मध्येच कलाकारांचे उपलब्धतेनुसार आदिवासी महोत्सव व सांस्कृतिक धोरणाप्रमाणे कार्यक्रम अंदाजपत्रकीय तरतुदीचे मर्यादेत आयोजित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५५२ विषय क्रमांक – ५३
दिनांक – ०५/०८/२०१४
सुचक – मा.सुनिता गवळी अनुमोदक – मा.विनय गायकवाड
संदर्भ:- मा.सुनिता गवळी, मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव -

जलक्षेत्र क्र. ड/९ ते १५ टाकीवरील वितरण व्यवस्थेसाठी ठेकेदारी पद्धतीने मजूर पुरविणे (नवीन क प्रभागातील भाग ९ ते १५ सांगवी, दापोडी भाग) चे काम मे.शुभम उद्योग, पिंपरी या संस्थेमार्फत चालु असून सदर कामाची मुदत १२ महिने (३१/१२/१४) अखेर होती. परंतु सदर कामाची तरतूद ऑगस्ट २०१४ अखेर इतकीच असल्याने सदर काम ऑगस्ट २०१४ रोजी संपणार असल्याने पुढील काळामध्ये पाणीपुरवठा विस्कळीत होऊ नये व पर्यायी यंत्रणा म.न.पा.कडे उपलब्ध नसल्याने कामाची निकड लक्षात घेऊन मे.शुभम उद्योग यांचा कामाचा पुर्वानुभव चांगला असल्याने मे.शुभम उद्योग यांना ऑगस्ट २०१४ नंतर पुढील निविदाधारक संस्थेची नेमणूक होईपर्यंत कामास मुदतवाढ व त्यासाठी येणा-या र.रु.पन्नास लाख पर्यंतचे प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. (चालू किमान वेतन दराने)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५५३ विषय क्रमांक – ५४
दिनांक – ०५/०८/२०१४
सुचक – मा.सुनिता गवळी अनुमोदक – मा.विनय गायकवाड
संदर्भ:- मा.सुनिता गवळी, मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव -

ब प्रभागातील सन २०१४-१५ च्या मुळ अंदाजपत्रकातील स्थापत्य विकास कामांच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.२१,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५५४ विषय क्रमांक – ५५

दिनांक – ०५/०८/२०१४

सुचक – मा.सुनिता गवळी अनुमोदक – मा.विनय गायकवाड

संदर्भ:- मा.सुनिता गवळी, मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव -

ड प्रभागातील सन २०१४-१५ च्या मुळ अंदाजपत्रकातील स्थापत्य विकास कामांच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.१३,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५५५ विषय क्रमांक – ५६

दिनांक – ०५/०८/२०१४

सुचक – मा.सुनिता गवळी अनुमोदक – मा.विनय गायकवाड

संदर्भ:- मा.सुनिता गवळी, मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव -

सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पातील अ प्रभाग (मुख्यालयातील) कामांच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.३,५०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५५६ विषय क्रमांक – ५७

दिनांक – ०५/०८/२०१४

सुचक – मा.सुनिता गवळी अनुमोदक – मा.विनय गायकवाड

संदर्भ:- मा.सुनिता गवळी, मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव -

मुक्तांगण एक्सप्लोरेटरी सायन्स सेंटर इयत्ता ८ वी व ९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी वैज्ञानिक प्रयोगातून विज्ञान शिक्षण हा उपक्रम राबविण्यासाठी त्यांनी सादर केलेल्या दराप्रमाणे मनपा विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण उपलब्ध करुन देण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५५७ विषय क्रमांक – ५८

दिनांक – ०५/०८/२०१४

सुचक – मा.सुनिता गवळी अनुमोदक – मा.विनय गायकवाड

संदर्भ:- मा.सुनिता गवळी, मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या २०१४-१५ च्या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.४,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५५८ विषय क्रमांक – ५९

दिनांक – ०५/०८/२०१४

सुचक – मा.सुनिता गवळी अनुमोदक – मा.विनय गायकवाड

संदर्भ:- मा.सुनिता गवळी, मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव -

महानगरपालिकेच्या सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकामधील प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.३८,४०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ७५५९ विषय क्रमांक – ६०
दिनांक – ०५/०८/२०१४
सुचक – मा.सुनिता गवळी अनुमोदक – मा.विनय गायकवाड
संदर्भ:- मा.सुनिता गवळी, मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव -

ब प्रभागातील सन २०१४-१५ च्या मुळ अंदाजपत्रकातील स्थापत्य विकास कामांच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.८,५०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५६० विषय क्रमांक – ६१
दिनांक – ०५/०८/२०१४
सुचक – मा.सुनिता गवळी अनुमोदक – मा.विनय गायकवाड
संदर्भ:- मा.सुनिता गवळी, मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव -

ब प्रभागातील सन २०१४-१५ च्या मुळ अंदाजपत्रकातील स्थापत्य विकास कामांच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.३,५०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५६१ विषय क्रमांक – ६२
दिनांक – ०५/०८/२०१४
सुचक – मा.सुनिता गवळी अनुमोदक – मा.विनय गायकवाड
संदर्भ:- मा.सुनिता गवळी, मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.५,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५६२ विषय क्रमांक – ६३
दिनांक – ०५/०८/२०१४
सुचक – मा.सुनिता गवळी अनुमोदक – मा.विनय गायकवाड
संदर्भ:- मा.सुनिता गवळी, मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव -

मनपाचे उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्रमांक २/१/२०१२-१३ व २/२/२०१२-१३ मधील मोशी कचरा डेपो व स.नं.१३१ कचरा डेपो येथे वृक्षारोपण व त्याची दोन वर्षे देखभाल पाण्यासह करणेकामी नि.नो.क्र.२/१ व २/२/२०१२-१३ चे दराने मे.अथर्व स्वयंरोजगार औद्योगिक सेवा सहकारी संस्था मर्या. यांना देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५६३ विषय क्रमांक – ६४

दिनांक – ०५/०८/२०१४ विभाग - पाणीपुरवठा

सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/१०६२/२०१४ दि.०४/०८/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा कार्यालयाकडील नि.नो.क्र.२०/२०-२०१३-२०१४ मधील अ.क्र.२० अन्वये, सन २०१३-१४ साठी जलक्षेत्र क्र. बी/१/, बी/२, बी/३, बी/४ येथे वॉल्व्ह ऑपरेशनसाठी मजूर कर्मचारी पुरविणेकामी मे.शुभम उद्योग (नि.र.रू.६९,२९,१७०/- (अक्षरी र.रू.एकोणसत्तर लाख एकोणतीस हजार एकशे सत्तर) पेक्षा ६.४८% जादा) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५६४ विषय क्रमांक – ६५

दिनांक – ०५/०८/२०१४

सुचक – मा.सुनिता गवळी अनुमोदक – मा.विनय गायकवाड

संदर्भ:- मा.सुनिता गवळी, मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव -

स्थापत्य "क" क्षेत्रिय कार्यालयातील प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.५,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५६५ विषय क्रमांक – ६६

दिनांक – ०५/०८/२०१४ विभाग – नागरवस्ती विकास योजना

सुचक – मा.माया बारणे अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे

संदर्भ:- मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.नावियो/०४/कावि/१९२/१४ दि.०५/०८/२०१४

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिलांसाठी विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. पहिल्या मुलीवर कुटूंब नियोजन शस्त्रक्रीया करणा-या अथवा पहिली मुलगी असताना दुसरी मुलगी झाल्यास दुस-या मुलीवर कुटूंब नियोजन शस्त्रक्रीया करणा-या महिलेस अर्थसहाय्य देणे सन २०१३-१४ या आर्थिक वर्षासाठी जाहीरप्रकटनाद्वारे अर्ज मागविणेत आले असता एकुण ९० अर्ज प्राप्त झाले. या अर्जांची छानननी केली असता एकुण ३७ अर्ज पात्र व ५३ अर्ज अपात्र आहेत. तरी पात्र अर्जदारांना योजनेच्या नियमांनुसार अर्थसहाय्य अदा करणे आवश्यक आहे. तरी सदर पात्र लाभार्थींस आई व मुलगी यांचे संयुक्त नावे राष्ट्रीयकृत बँकेमध्ये मुलीच्या जन्म दिनांकापासुन अठरा वर्षापर्यंत कालावधीसाठी मुदत ठेव पावती स्वरुपात पहिल्या मुलीवर शस्त्रक्रीया करणा-या ४ लाभार्थींना प्रत्येकी र.रु.२५,०००/- प्रमाणे १,००,०००/- (अक्षरी र.रु. एक लाख फक्त) व दोन मुलींवर शस्त्रक्रीया करणा-या ३३ लाभार्थींस प्रत्येकी र.रु.१०,०००/- (अक्षरी र.रु. दहा हजार फक्त) प्रमाणे ३,३०,०००/- (अक्षरी र.रु. तीन लाख तीस हजार फक्त) असे एकुण र.रु.४,३०,०००/- (अक्षरी र.रु.चार लाख तीस हजार फक्त) खर्च अपेक्षित आहे. तसेच ५३ अपात्र लाभार्थींना त्रुटी पुर्ततेनंतर पात्र करुन सन २०१४-१४ अखेर सदर अर्थसहाय्य मंजुरीकामी व सदर रक्कम अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५६६ विषय क्रमांक – ६७

दिनांक – ०५/०८/२०१४

सुचक – मा.विनय गायकवाड अनुमोदक – मा.शांताराम भालेकर

संदर्भ:- मा.विनय गायकवाड, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव -

मनपाचे उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र. ७/२०१३-१४ मधील बाब क्र. ११ अन्वये कै.सिताराम भागुजी लोंढे उद्यान देखभाल करणेकामी मे.निसर्ग लॅण्डस्केप सर्व्हीसेस (नि.र.रु.१६,८७,२८४/- पेक्षा १५ टक्के कमी) या ठेकेदाराची निविदा अंदाजपत्रकिय दरापेक्षा १५.०० ही सर्वात कमी दराची निविदा स्विकृत करणेत आली असुन त्यांचेशी करारनामा करुन घेणेस व प्रस्तुत कामी तीन वर्षांसाठी येणारे खर्चास मा.महापालिका आयुक्त यांची मंजुरी असली तरी मनपाचे उद्यान कामकाजामध्ये स्थानिक संस्थांचा सहभाग असावा या उद्देशाने भोसरी येथील कै.सिताराम भागुजी लोंढे उद्यानाच्या देखभालीचे कामकाज निविदा नोटीस क्र.७/२०१३-१४ नुसार सदर देखभाल मे.निसर्ग लॅण्डस्केप सर्व्हीसेस यांचेऐवजी सदर उद्यान देखभालीचे कामकाज मे.तुळजा भवानी सर्व्हीसेस भोसरी यांना निविदा दरानुसार तीन वर्ष कालावधीसाठी देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५६७ विषय क्रमांक – ६८

दिनांक – ०५/०८/२०१४

सुचक – मा.सुनिता गवळी अनुमोदक – मा.विनय गायकवाड

संदर्भ:- मा.सुनिता गवळी, मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव –

घंटागाडी कर्मचा-यांना सन २०१३-२०१४ सालाकरिता र.रु.१५,०००/- (पंधरा हजार रुपये फक्त) दिपावलीनिमित्त बक्षिस रक्कम विनापरतावा विशेष बाब म्हणून अदा करणेस (एका वर्षामध्ये सहा महिन्यांपासून पूर्ण वर्षापर्यंत सलग काम केले असल्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. मा.महापालिका सभेकडील मान्यतेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५६८ विषय क्रमांक – ६९

दिनांक – ०५/०८/२०१४

सुचक – मा.सुनिता गवळी अनुमोदक – मा.विनय गायकवाड

संदर्भ:- मा.सुनिता गवळी, मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव –

घंटागाडी कामगार आरोग्य विभागामध्ये गेली १७ वर्षे आरोग्य विषयक दैनंदिन साफसफाईचे काम करीत आहेत. त्यांच्या आर्थिक परिस्थितीचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन घंटागाडी कामगारांना दरमहा रु.९,०००/- (नऊ हजार रुपये) ऐवजी दरमहा रु.१५,०००/- पगार देण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५६९ विषय क्रमांक –७०

दिनांक – ०५/०८/२०१४

सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भ:- मा.शांताराम भालेकर, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव –

उद्यान विभागास आवश्यक एकूण ३ (तीन) FRP केबीन्स (साईज १०X१०X८ फू.) प्रती नग र.रु.१,८०,०००/- + र.रु.२३,०५८/- फौंडेशन खर्च = एकूण र.रु.२,०३,०५८/- प्रतीनग या दराने मे.एन.डी.ए. प्लास्टेक यांचेकडून निविदा न मागविता थेट पद्धतीने सदरकामी यापूर्वी काढणेत आलेल्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र. ११/२००७-०८ चे मंजूर दराचे अनुषंगाने येणारे र.रु.६,०९,१७४/- (अक्षरी र.रु.सहा लाख नऊ हजार एकशे चौ-याहत्तर फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५७० विषय क्रमांक – ७१

दिनांक – ०५/०८/२०१४

सुचक – मा.सुनिता गवळी अनुमोदक – मा.विनय गायकवाड

संदर्भ:- मा.सुनिता गवळी, मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्रमांक ५ मधील संत सावतामाळी उद्यान हे स्थानिक माऊली बेरोजगार सेवा संस्था चिखली यांना मनपाच्या अटीशर्तीनुसार व दरानुसार ३ वर्ष कालावधीनुसार देखभाल दुरुस्तीसाठी देण्यास व त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५७१ विषय क्रमांक – ७२

दिनांक – ०५/०८/२०१४

सुचक – मा.सुनिता गवळी अनुमोदक – मा.विनय गायकवाड

संदर्भ:- मा.सुनिता गवळी, मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव –

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात औषध दुकानासाठी पिंपरी चिंचवड कर्मचारी महासंघास २४० स्क्वे. फूट जागा १३.५० रु. प्रति चौ. फुटाने दि. २६/११/२०१३ रोजी बप्र/४/८२७/२०१३ अन्वये भाडे तत्वाने दिली असून औषध विक्रेता परवाना मिळणेसाठी किमान ५ वर्षे जागा भाडे करार असणे आवश्यक आहे. तरी औषध दुकान चालू करण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिका कर्मचारी महासंघाबरोबर भाडेकरार ५ वर्षे कालावधीचा करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावा प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५७२ विषय क्रमांक – ७३

दिनांक – ०५/०८/२०१४

सुचक – मा.सुनिता गवळी अनुमोदक – मा.विनय गायकवाड

संदर्भ:- मा.सुनिता गवळी, मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.३०,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५७३ विषय क्रमांक – ७४

दिनांक – ०५/०८/२०१४

सुचक – मा.सुनिता गवळी अनुमोदक – मा.विनय गायकवाड

संदर्भ:- मा.सुनिता गवळी, मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव –

दूरसंचार सुविधांच्या जाळ्यांसाठी उपकरणांची व बेस स्टेशन उभागणीसाठी ग्राऊंड बेसड टेलिकॉम मास्टस् उभारणेसाठी खालील बाबींस मान्यता देणेत येत आहे.

१) दूरसंचार सुविधांच्या जाळ्यांसाठी उपकरणांची व बेस स्टेशन उभारणीसाठी ग्राऊंड बेसड टेलिकॉम मास्टस् उभारणेबाबत सन २०१४ च्या रेडीरेकनरनुसार २ मी. X २ मी. (४ चौ.मी.) क्षेत्राकरिता प्रतिमहाचे मुल्यांकन र.रु.२५००/- प्रति टॉवर निश्चित करण्यात येत आहे.
२) मा.नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. टीपीएस १८१०/१९७५/प्र.क्र. नवीन ६५/१२/वियो/नवि दि. ४/३/२०१४ मधील अटी व शर्ती सदर कामास बंधनकारक राहतील.
३) मनपा जागा निश्चित झाल्यानंतर ग्राऊंड बेसड टेलिकॉम मास्टस् उभारणेसाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका मिळकत वाटप नियमावली २००८ मधील तरतुदीनुसार जाहीर निविदा प्रक्रिया राबवण्यात यावी.
४) वरील धोरण सर्व मान्यता प्राप्त दूरसंचार संस्थांसाठी लागू राहतील.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५७४ विषय क्रमांक – ७५

दिनांक – ०५/०८/२०१४

सुचक – मा.सुनिता गवळी अनुमोदक – मा.विनय गायकवाड

संदर्भ:- मा.सुनिता गवळी, मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव –

अंकुशराव लांडगे सभागृहाशेजारील रस्त्याचे चौकात मनपातर्फे गिर्यारोहकाचा पुतळा उभारणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच सदर रस्त्यास गिर्यारोहक कै.रमेश नारद गुळवे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५७५ विषय क्रमांक – ७६

दिनांक – ०५/०८/२०१४

सुचक – मा.सुनिता गवळी अनुमोदक – मा.विनय गायकवाड

संदर्भ:- मा.सुनिता गवळी, मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव –

झोनिपु स्थापत्य विभागाकडील प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.३१,५०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५७६ विषय क्रमांक – ७७

दिनांक - ०५/०८/२०१४

सुचक – मा.सुनिता गवळी अनुमोदक – मा.विनय गायकवाड

संदर्भ:- मा.सुनिता गवळी, मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव –

झोनिपु स्थापत्य विभागाकडील प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.१,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( महेशदादा किसन लांडगे )
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/४/कावि/६६२/२०१४
दिनांक - ०७/०८/२०१४



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.